महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २१ वा दिनांक : ०५/१०/२०२४ वार : शनिवार

## एम.आय.एम.ला आघाडीमध्ये नो चान्स



**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एमआयएम पक्षाच्या वतीने महाआघाडीमध्ये समावेश होण्याची भूमिका घेण्यात आली आहे. यासंदर्भातला प्रस्ताव महाविकास आघाडीकडे पाठवण्यात आला आहे. महाविकास आघाडी मध्ये आम्हाला किती जागा देणार, हे तुम्ही स्पष्ट करा, असे आवाहन एमआयएमचे राज्यातील प्रमुख नेते माजी खासदार इम्तियाज जलील यांनी केले आहे. तर दुसरीकडे उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी नवीन पक्षाला महाआघाडीमध्ये जागा देणे कठीण असल्याचे म्हटले आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीत एमआयएम पक्ष हा आघाडीमध्ये जाण्यास इच्छुक आहे. तसा प्रस्ताव देखील एमआयएमच्या वतीने महाविकास आघाडीला देण्यात आला आहे. या संदर्भात शरद पवार यांनी भूमिका घेण्याचे आवाहन एमआयएमच्या वतीने करण्यात आले आहे. शरद पवार यांनी देखील सकारात्मक संकेत दिले असल्याचे बोलले जात आहे. तर दुसरीकडे आघाडीमध्ये नवीन पक्षाला जागा नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. सध्या महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना हे तीन प्रमुख पक्ष आहेत. याशिवाय कम्युनिस्ट पक्षाचे दोन्ही भाग, शेतकरी कामगार पक्ष आणि मुस्लिम समाजाचे नेतृत्व करणारा समाजवादी पक्ष देखील आघाडीमध्ये आहे. त्यामुळे या सगळ्या परिस्थितीमध्ये नवीन पक्षाला जागा देणे आम्हाला कठीण दिसत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

वास्तविक आघाडीमध्ये आधीच भरपूर पक्ष आहेत. कम्युनिस्ट, शेतकरी, मुस्लिम समाज याबरोबरच रिपब्लिकन पक्षाच्या काही संघटना देखील आघाडीमध्ये आहेत. त्यामुळे या सर्व परिस्थितीत राज्यात केवळ २८८ मतदारसंघ आहेत. अशावेळी नवीन पक्षाला महाआघाडीमध्ये जागा देणे आम्हाला कठीण दिसत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. यासंदर्भात शरद पवार यांनी काही भूमिका घेतली असेल तर त्यांच्याशी देखील आम्ही चर्चा करू, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.

## नरहरी झिरवळांना आंदोलन करणे शोभत नाही - संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी केलेले आंदोलन हे सत्ताधारी पक्षाला शोभत नाही. हे आंदोलन करण्यापूर्वी त्यांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करायला हवी होती. त्यांचे हे आंदोलन त्यांच्या पदाला न शोभणारे नाही, अशा तिखट शब्दांत शिवसेना आमदार संजय शिरसाट यांनी आदिवासी आमदारांनी मंत्रालयात केलेल्या आंदोलनावर नाराजी व्यक्त केली आहे. नरहरी झिरवळ तसेच इतर आमदारांनी केलेल्या आंदोलनामुळे सरकारचे विरोधात नाराजी असल्याची चर्चा सुरू झाली आहे. तसेच विरोधकांनी देखील या प्रकरणात टीका केली आहे. संजय शिरसाट यांनी या आंदोलनावर भाष्य करताना त्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, विधानसभा उपाध्यक्ष यासारख्या घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तीने अशा प्रकारे आंदोलन करणे उचित नाही. त्यांनी आंदोलन करण्यापूर्वी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्याची गरज होती. हे आंदोलन ते आरुढ असणाऱ्या पदाला शोभत नाही.

**४ वेळा मुख्यमंत्री असताना शरद पवार यांनी काय केले**

संजय शिरसाट यांनी यावेळी शरद पवारांनी आरक्षणाची मर्यादा वाढवण्यासंबंधी केलेल्या विधानाचाही समाचार घेतला. ते म्हणाले, शरद पवार यांनी आरक्षणाची मर्यादा ७५ टक्के पर्यंत करण्याचे सूतोवाच केले आहे. केंद्र सरकारने यासंबंधी एखादा निर्णय घेतला तर त्याला आपण पाठिंबा देऊ असे ते म्हणालेत. पण शरद पवार स्वतः महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्री राहिलेत. मात्र चारही वेळा त्यांनी याबाबत कुठलाही निर्णय घेतलेला नाही. चार वेळा मुख्यमंत्री असताना त्यांना आरक्षणाची कुठलीही आठवण झाली नाही. त्या काळात केंद्रात सत्ता असतानाही त्यांनी याविषयी अशी कुठलीही चर्चा केली नाही. त्यामुळे केवळ निवडणुका आल्यानंतर अशा चर्चा केल्या जात असल्याची टीका शिरसाट यांनी यावेळी केली




## मयुरी विशाल शिंदे यांना पीएच. डी. पदवी प्रदान



मयूरी विशाल शिंदे यांना नुकतीच गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील संगणक विभागातील आचार्य पदवी प्रदान करण्यात आली. त्यांचा विषय "**Information Stream Methods for Cluster Analysis Towards Evaluating Standard Synthetic Data Stream and Authentic Life Data Streams**" हा होता निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. मोहिनूद्दीन कादरी तसेच प्राध्यापक डॉ. एस. बी. किशोर सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपुर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे प्रबंध सादर केला होता. दिनांक २ ऑक्टोंबर रोजी गोंडवाना विद्यापीठाच्या तेराव्या वर्धापन दिन व अकरावा व बारावा दीक्षांत समारंभात विद्यापीठाच्या परिसरातील सभागृहात श्री. सी.पी. राधाकृष्णन, माननीय कुलपती तथा राज्यपाल महाराष्ट्र राज्य तसेच श्री नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री महामार्ग व रस्ते वाहतूक, भारत सरकार, डॉ. प्रशांत बोकारे, कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली तसेच डॉ. श्रीराम कावळे, प्र. कुलगुरू यांच्या प्रमुख उपस्थितीत पी.एच.डी पदवी प्रदान करण्यात येणार आहे.सौ. मयूरी विशाल शिंदे यांचे संशोधनपर शोधप्रबंध स्कोपस इडेक्स डब्लु. ओ. एस. तसेच यू.जी.सी. सारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शोध पत्रिकेत प्रकाशित झाले असून अनेक परीसंवाद व परिषदांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. या संशोधनाचा उपयोग वैद्यकीय व बँकिंग या सारख्या क्षेत्रात करता येणार आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ ऑक्टोबर २०२४


## आमदारांनी मारल्या मंत्रालयाच्या संरक्षक जाळीवर उड्या



**मुंबई** : धनगरांना अनुसूचित जमातीतून आरक्षण देण्याच्या मागणीविरोधात विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्या नेतृत्वाखाली सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील आदिवासी आमदार आक्रमक झाले आहेत. शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा निष्फळ झाल्याचे सांगत आदिवासी समाजातील आमदारांनी मंत्रालयातील संरक्षण जाळीवर उतरून आंदोलन सुरु केले.

धनगर समाजाला आदिवासी समाजात समाविष्ट करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी समिती गठीत केली आहे. यासंदर्भात कायद्याचा मसुदाही तयार केला जात आहे. धनगरांचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यास आदिवासींचा विरोध आहे. यासंदर्भात आदिवासी समाजात प्रचंड रोष आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि नरहरी झिरवाळ यांच्यात चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्ही तुमच्या विषयाबाबत सकारात्मक आहोत, असे आश्वासन नरहरी झिरवाळ यांना दिले. मात्र कुठलाही निर्णय न झाल्याने आदिवासी आमदारांनी आक्रमक पवित्रा उचलला आहे.

नरहरी झिरवाळ, आमदार हिरामन खोसकर यांच्यासह यांचे सहका-यांनी थेट मंत्रालयातील संरक्षण जाळीवर उतरून आंदोलन सुरु केले. मात्र, पोलिसांनी त्यांना संरक्षण जाळीवरून बाहेर काढले. तरीही नरहरी झिरवाळ यांच्यासह आदिवासी आमदार आक्रमक झाले आणि त्यांनी मंत्रालयात ठिय्या आंदोलन सुरु केले. तसेच, गेल्या १५ दिवसांपासून आदिवासी विद्यार्थ्यांकडून पेसाभरती अंतर्गत भरतीच्या आंदोलन करत आहेत. मात्र, यावर कुठलाही तोडगा निघत नसल्याने आज आदिवासी आमदारांनी असे आक्रमक पाऊल उचलले.

पेसा कायद्याची अंमलबजावणी नाहीराज्यात पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली होती. त्यावेळी शिंदे यांनी १५ सप्टेंबरपर्यंत पेसा कायद्यांतर्गत नोकरभरती सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, अद्यापही या आश्वासनांची पूर्तता झाली नाही, असा आरोप नरहरी झिरवाळ यांनी केला. त्यामुळे ऐन निवडणुकीच्या तोंडावर मराठा आणि ओबीसी आंदोलनापाठोपाठ सत्ताधारी पक्षाच्या आदिवासी आमदारांचे आंदोलन महायुती सरकारची डोकेदुखी वाढवणार असल्याचे चित्र आहे.

झिरवळ साहेब इतक्या मोठ्या पदावर आहेत, सरकारचे जबाबदार प्रतिनिधी आहेत. त्यांनी असे पाऊल उचलण्याची आवश्यकता नाही. जो काही विषय होईल तो मुख्यमंत्री साहेबांच्या चर्चेतून सोडवला जाईल. इतकी टोकाची भूमिका घेण्याची आवश्यकता नाही. सरकार आता ब-याच घटकांना न्याय देण्याच्या संदर्भात प्रयत्न करत आहेत. पेसासंदर्भात देखील सरकार चांगली भूमिका घेईल. त्यामुळे झिरवाळ साहेबांनी कुठलीही टोकाची भूमिका घेऊ नये असी प्रतिक्रिया भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी दिली आहे.

## हर्षवर्धन पाटील यांची भाजपला सोडचिठ्ठी :राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार



**पुणे** : इंदापूरचे माजी आमदार हर्षवर्धन पाटील यांनी अखेर शुक्रवारी भाजपला सोडचिठ्ठी दिली. त्यांनी इंदापूरमध्ये आयोजित एका पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याची घोषणा केली. त्यांच्या प्रवेशामुळे शरद पवार गटाची ताकद वाढली असून, सत्ताधारी महायुती विशेषतः भाजपला जोरदार झटका बसला आहे.

हर्षवर्धन पाटील यांनी आज इंदापूर येथे आपल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या बैठकीनंतर आयोजित एका पत्रकार परिषदेत त्यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याची घोषणा केली. हर्षवर्धन पाटील म्हणाले, मागील २ महिन्यांपासून मी तालुक्यात फिरत आहे. त्यात सर्वच कार्यकर्त्यांनी माझ्याकडे विधानसभा निवडणूक लढवण्याचा आग्रह धरला. त्यानुसार मी काल शरद पवार यांची सिल्व्हर ओक येथे भेट घेतली. या बैठकीत आमची सखोल चर्चा झाली. पवारांनीही माझ्याकडे निवडणूक लढवण्याचा आग्रह धरला. हा आग्रह जनतेचाच असल्याचे ते म्हणाले.

शरद पवार व माझी काल सिल्व्हर ओकवर बैठक झाली. या बैठकीत शरद पवारांनी माझ्याकडे पक्षात येण्याचा आग्रह धरला. खासदार सुप्रिया सुळे यांनीही तसा आग्रह धरला. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही माझ्याशी चर्चा केली. त्यानंतर मी त्यांना कार्यकर्त्यांशी विचारविनिमय घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाण्याचा निर्णय घेतला. आम्ही आमच्या भाजप सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.

हा निर्णय माझ्या एकट्याचा नाही. यासंबंधी मी भाजपच्या प्रमुख नेत्यांशी चर्चा केली. त्यात रावसाहेब दानवे, राधाकृष्ण विखे पाटील व इतर नेत्यांशी सल्लामसलत केली. त्यांनाही या सर्व विषयाची कल्पना दिली आहे.

हा निर्णय घेताना आज इंदापूर तालुक्यात लोकांची, जनतेची भूमिका फार महत्त्वाची आहे. कारण, गत १० वर्षांत या तालुक्यात आमच्यामागे उभे राहणाऱ्या माणसांवर फार अन्याय झाला. विकासकामांऐवजी अन्याय मोठ्या प्रमाणात झाला. त्यामुळे हा जनतेचा उद्रेक या भागात निर्माण झाला. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे आम्ही हा निर्णय घेतला आहे, असे हर्षवर्धन पाटील म्हणाले.

हर्षवर्धन पाटील म्हणाले, मी ४-५ दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी मला इंदापूरची जागा महायुतीत मित्र पक्षाच्या विद्यमान आमदाराला सुटणार असल्याचे स्पष्ट सांगितले. तसेच माझ्यासाठी वेगळा पर्याय देण्याचेही संकेत दिले. पण त्यांचा पर्याय मला व माझ्या कार्यकर्त्यांना मान्य नव्हता. त्यामुळे त्यांना मी तिथेच निवडणूक लढवण्याच्या आपल्या निर्णयाची माहिती दिली, असे ते म्हणाले.

आम्ही सर्वांनी केवळ त्यांच्या पक्षात जाण्याचा निर्णय घेतला आहे. आता पक्षप्रवेश कधी होईल हे शरद पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील हे ठरवतील. त्यावर भाष्य करण्याचा अधिकार माझा नाही, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

पत्रकारांनी यावेळी हर्षवर्धन पाटील यांना तुम्ही आतापर्यंत नेहमीच पवारांवर टीका केली आणि आज तुम्हीच त्यांच्या पक्षात जात आहात? असा थेट प्रश्न केला. त्यावर पाटील यांनी राजकारणात कुणीच कुणाचे कायमचे शत्रू नसतात असे स्पष्ट केले. ते म्हणाले, राजकारणात कुणीच कुणाचे कायमचे शत्रू नसते. आमचे पवारांशी खूप जुने व चांगले आहेत. आज मी निर्णय घेतला म्हणून माझे इतर पक्षांच्या नेत्यांसोबतचे संबंध बिघडणार नाहीत. राजकारण व समाजकारणात संबंध टिकवावे लागतात. ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. ती संस्कृती टिकवण्याची आपली जबाबदारी आहे.

## मलायका आरोराचं मराठी चित्रपटात पदार्पण



अवघ्या बॉलिवूडला भुरळ घालणारी अभिनेत्री मलायका अरोरा मराठी गाण्याच्या माध्यमातून मराठी सिनेसृष्टीत पदार्पण करत आहे.या रॅपसाँगमधून मलायका तिच्या अदाकारीने रसिकांना घायाळ करणार आहे आणि यात तिला साथ लाभणार आहे महाराष्ट्राचा लाडका अभिनेता सिद्धार्थ जाधव ही आहे. हे आयटम साँग ऐकायला जितके एनर्जेटिक आहे तितकंच ते पाहायलाही कमाल आहे. प्रत्येकाला ठेका धरायला लावणाऱ्या या गाण्यात सिद्धार्थ एका अनोख्या अंदाजात दिसत आहे. या गाण्याबद्दल अजय गोगावले म्हणाला, "पूर्वी चित्रपटात हमखास आयटम साँग असायचे. हा प्रकार हल्ली जरा कमी झाला होता. मात्र पुन्हा एकदा आम्हाला येक नंबरच्या निमित्ताने आयटम साँग करण्याची संधी मिळाली.

या चित्रपटात आयटम साँग असलं तरी ते विनाकारण नाही. कारण मुळात कथेची गरज होती. परंतु आपल्याकडे नृत्य म्हटलं की मराठी ठेका, आपली एक मराठी शैली येते. परंतु आम्हाला यात काहीतरी वेगळं करायचं होतं. त्यामुळे याचाच आधार घेत आम्ही रॅप, हिपहॉप पद्धतीने हे गाणं करण्याचा एक नवीन प्रयत्न केला आहे."

## केंद्राने आरक्षण मर्यादा ५०% वरून ७५% वर वाढवण्याचा निर्णय घेतल्यास आमचा पाठिंबा - शरद पवार






**मुंबई** : राज्यात मराठा, ओबीसी आणि धनगर समाजाचे आरक्षणावरून वाद सुरू आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे गेल्या वर्षभरापासून लढा देत आहेत. अशात राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी आरक्षणावरून मोठे वक्तव्य केले आहे. आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवरून ७५ टक्क्यांवर न्या, असे शरद पवार म्हणाले. केंद्राने आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा निर्णय घेतल्यास आमचा पाठिंबा असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

शरद पवार यांनी आज सकाळी पत्रकार परिषद घेतली यावेळी आरक्षणासह विविध विषयांवर भाष्य केले. आरक्षणावर बोलताना ते म्हणाले की, आरक्षण मिळावे ही लोकांची भावना आहे, त्यात काही चुकीचे नाही. मात्र आरक्षण देताना इतरांच्या आरक्षणाला धक्का लागणार याची काळजी घेणे गरजेचे आहे, असेही शरद पवार म्हणाले. मराठा आरक्षणासोबतच इतर जे समाज आरक्षणाची मागणी करत आहेत, त्यांनाही इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता आरक्षण मिळावे, अशी भूमिका शरद पवारांनी यावेळी मांडली.

आरक्षणासाठी केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा, आमचा पाठिंबा

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, आरक्षणाच्या बाबतीत ५० टक्क्यांवर जाता येत नाही. ५० टक्क्यांच्यावर आरक्षण पाहिजे असेल तर त्यासाठी संसदेत कायदेशीर दुरूस्ती करावी लागते. त्यात दुरुस्ती करायला काय हरकत आहे. आता ५० टक्क्यांवरील ७५ टक्क्यांपर्यंत जाऊ द्या. आता ५० टक्के आहे, ७५ टक्के होण्यासाठी २५ ने वाढवावे लागेल. ज्याला आरक्षण मिळाले नाही, त्यांचा २५ टक्क्यांमध्ये समावेश करता येईल. यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा. संसदेत विधेयक आणावे. आम्ही त्यांना पाठिंबा देऊ, असे शरद पवार म्हणाले.

महिला अत्याचारांतील वाढ चिंताजनक

सरकारने लाडकी लेक योजना आणली आहे, त्याचे स्वागत आहे. पण तेवढ्यावर भागत नाही. मुलींवर होणाऱ्या अत्याचाराबाबत सरकारने पावले उचलले पाहिजे, महिला अत्याचारांतील वाढ चिंताजनक आहे.. लाडकी लेकसाठी हजारो कोटींची तरतूद करत असताना सरकारच्या अन्य योजना थंडावल्या आहेत, असेही शरद पवार म्हणाले.

अमित शहांच्या टीकेला दिले प्रत्युत्तर

शरद पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिले आहे. देशाचा गृहमंत्री भाषणामध्ये शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यावर लक्ष ठेवा असे सांगतात. लोकसभा निवडणुकीत त्यांनी १८ ठिकाणी सभा घेतल्या होत्या. त्यापैकी १४ जागांवर त्यांचा पराभव झाला. त्यामुळे त्यांनी यावेळी देखील जास्त सभा घ्याव्यात, असा टोला शरद पवारांनी लगावला.

प्रकाश आंबेडकरांवरही केली टीका

ज्यांना एकही जागा निवडणूक आणता आली नाही. ते लोक माझ्यावर बोलत असतात. केवळ प्रसिद्धीसाठी माझ्यावर बोलत असतात, अशी टीका शरद पवार यांनी प्रकाश आंबेडकरांवर केली.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड., एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ ऑक्टोबर २०२४


## मराठी भाषेबरोबरच राज्याची प्रतिष्ठाही वाढली पाहिजे -संजय राऊत



**मुंबई :** मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे हा मोठा सन्मान आहे. बंगाली, मराठी, पाली, प्राकृत आणि आसामी या पाच भाषांना हा सन्मान देण्यात आला आहे. मराठी भाषेला हा सन्मान मिळावा, अशी अनेक वर्षांपासूनची मागणी होती.

खासदार राऊत पुढे म्हणाले की, राज्यातील जवळपास सर्वच पक्षांचे नेते, प्रत्येक मुख्यमंत्री आणि प्रत्येक राज्य सरकारने गेल्या ३०-३५ वर्षांपासून ही मागणी केली आहे. हे घडले असेल तर यात त्या सर्वांचे योगदान आहे, केवळ एका व्यक्तीचे नाही, प्रत्येक गोष्टीचे श्रेय घेण्याची भाजपला सवय आहे. भाजपने उद्योग-व्यवसाय या राज्यातून बाहेर जाणे थांबवावे, मराठी भाषेबरोबरच या राज्याची प्रतिष्ठा वाढली पाहिजे, अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोस्ट करून लिहिले की, एवढ्या जगात माय मानतो मराठी! धन्यवाद आदरणीय मोदीजी! माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला हा सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असा दिवस आहे. समस्त मराठी भाषकांतर्फे मी आपले मन:पूर्वक आभार मानतो. आपल्या समर्थ पाठबळामुळे हे शक्य झाले. अभिजात दर्जा मिळावा ही महाराष्ट्राची मागणी न्याय्य होती हे आता जगाला पटेल. मोदीजी, आपण माय मराठीचे पांग फेडले आहेत! पुन्हा एकवार धन्यवाद!

तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोस्ट करून सर्व मराठी भाषिकांचे अभिनंदन केले आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाचे फडणवीस यांनी आभार देखील मानले आहेत.

या व्यतिरिक्त केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पोस्ट करून लिहिले की, मराठी ही केवळ समृद्ध साहित्य निर्माण करणारी भाषा नाही तर तिने आपल्याला नेहमीच स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगण्याची प्रेरणा दिली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निर्णय आपल्या सर्वांसाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. त्यानिमित्त मराठी भाषिक भगिनी आणि बांधवांचे हार्दिक अभिनंदन.

## अभिनेता गोविंदाला रुग्णालयातून डिस्चार्ज



गोविंदाच्या डाव्या पायाच्या हाडाला दुखापत झाली असून आज त्याला डिस्चार्ज मिळाला आहे. पण तरी स्वत:च्या पायावर उभं राहणं त्याला शक्य नाही. पायातील गोळी काढण्यात आली असली तरी पूर्ण बरं होण्यासाठी 3 ते 4 आठवड्यांचा काळ लागेल, असे डॉक्टरांनी सांगितले.

बॉलिवूड अभिनेता आणि शिवसेना नेते गोविंदा यांना मुंबईतील क्रिटीकेअर एशिया रुग्णालयातून आज डिस्चार्ज देण्यात आला आहे. मंगळवारी अभिनेता गोविंदाच्याच हातून चुकून त्याच्याच रिव्हॉल्वरने पायात गोळी लागली होती. या घटनेनंतर गोविंदाला रूग्णालयात दाखल करण्यात आले. यानंतर गोविंदावर क्रिटीकेअर रुग्णालयाच उपचार सुरू होते. आज दुपारी एक वाजेच्या सुमारास अभिनेत्याला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. यावेळी त्याच्यासोबत त्याचं संपूर्ण कुटुंब देखील हजर होतं. डिस्चार्ज मिळाल्यानंतर अभिनेत्याने पहिली प्रतिक्रिया दिली आहे. 'अनेक ठिकाणी माझ्यासाठी अनेकांनी देवाकडे पूजा करण्यात आली. माझ्यासाठी अनेकांनी दुवा केल्या त्यासाठी मी सर्वांचे आभार मानतो. माध्यमांचे, पोलिसांचे आणि प्रशासनाचे देखील मी आभार मानतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानतो. विशेषत: माझ्यावर मनापासून प्रेम करणाऱ्यांचे आभार मानतो', असं गोविंदाने डिस्चार्ज मिळताना प्रतिक्रिया दिली. पुढे असेही म्हणाले की, तुमच्या कृपा आणि आशीर्वादामुळे मी सुरक्षित आहे. तुमच्याकडून मिळत असलेल्या प्रेमाबद्दल आभारी आहे... जय माता दी...' असं गोविंदा म्हणाला आहे.

## फडणवीस, मुनगंटीवारांना डी. लिट दिल्याने वाद : गोंडवाना विद्यापीठाविरोधात रस्त्यावरच भरवला समांतर दीक्षांत सोहळा





**नागपूर :** गडचिरोलीमधील गोंडवाना विद्यापीठ सध्या एका वेगळ्या कारणासाठी चर्चेत आले आहे. राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांच्या हस्ते 2 ऑक्टोबरला विद्यापीठाचा ११ व्या दीक्षांत समारंभ झाला. त्यात विद्यापीठाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना मानद 'डी.लीट.' पदवी बहाल केली. पण त्यावरून वाद निर्माण झाला आहे.

याला विरोध दर्शवण्यासाठी विद्यापीठात दीक्षांत समारंभ सुरू असतानाच गडचिरोलीच्या गडचिरोलीतील इंदिरा गांधी मुख्य चौकात समांतर दीक्षांत सोहळा आयोजित करून जी आमदार हिरामण वरखडे आणि आदिवासींच्या सांस्कृतिक अस्मितेसाठी काम करणाऱ्या वसंत कुलसंगे यांना प्रतिकात्मक अशी 'जनतेच्या विद्यापीठाची डी. लिट.' पदवी प्रदान करण्यात आली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमाला उपस्थित राहिले नाहीत. तर 'जीवन साधना' पुरस्काराने विदर्भ वनवासी कल्याण आश्रमाचे डॉ. शरद सालफळे यांना सन्मानित करण्यात आले. पण या संस्कृतीच्या संवर्धनासाठी आयुष्यभर कार्य केले त्यांना सन्मानित न करता काहीही संबंध नसणाऱ्यांना हे विद्यापीठ कसे काय डी.लिट सारखी पदवी देते? असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला आहे.

गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी "डी.लिट देण्याचा अधिकार विद्यापीठाला आहे. विद्यापीठाने त्या अधिकाराचा वापर केला. इतरांनी डी.लिट कशी दिली, त्यावर मी भाष्य करणार नाही', अशी प्रतिक्रिया दिली आहे. देवेंद्र फडणवीस हे गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. गडचिरोली जिल्ह्याच्या औद्योगिक विकासात आणि विद्यापीठाच्याही प्रस्तावित विकासामध्ये फडणवीस व मुनगंटीवार यांचा मोलाचा वाटा आहे. या विद्यापीठाचं विधेयक विधानसभेत आणण्यात सुधीर मुनगंटीवार यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे या विद्यापीठाची निर्मिती ज्यांच्या पुढाकारातून झाली त्यांना कायदेशीररित्या संविधातील व कायद्यातील तरतुदींचे पालन करून डी.लिट देण्यामध्ये काही गैर आहे, असे विद्यापीठाला वाटत नाही, असे ते म्हणाले.

विद्यापीठ सर्वसामान्य जनतेसाठी स्थापन केले की, एका विचारधारेच्या प्रचारासाठी, असा प्रश्न उपस्थित करत गडचिरोलीतील २१ विविध सामाजिक-राजकीय संघटनांनी निषेध केला आहे. १४ फेब्रुवारी रोजी गोंडवाना विद्यापीठात विशेष अधिसभेचे आयोजन करण्यात आले होते. यात व्यवस्थापन परिषदेच्या प्रस्तावानुसार राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वनमंत्री सुधीर मुगंटीवार यांना मानद डी.लिट. देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. या निर्णयावर काही सिनेट सदस्यांसह गडचिरोलीतील विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी आक्षेप घेत हा निर्णय मागे घेण्याची मागणी केली होती.

अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष, आदिवासी परिषद, अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांसारख्या संघटना आणि कार्यकर्त्यांनी गोंडवाना विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे यांच्याकडे निवेदन देवून डी.लिट व जीवन गौरव पुरस्कारावर आक्षेप नोंदवला.

## जाणून घ्या काकडी खाण्याचे फायदे



काकडीचे सेवन करणे हे शरीरासाठी फायदेशीर मानले जाते. शरीरातील पाण्याची कमतरता दूर करण्यापासून ते अनेक पोषक तत्वांची प्राप्तता होण्यासाठी काकडी खाणे लाभदायक ठरते. काकडीमध्ये कॅलरी, फॅट, कोलेस्ट्रॉल आणि सोडिअम इत्यादींचे प्रमाण कमी असते. जे आपल्या शरीरासाठी अनेक प्रकार फायदेशीर ठरते. काकडीमध्ये व्हिटॅमिन के, व्हिटॅमिन डी यासारखी पोषक तत्वं (Nutrition) मुबलक प्रमाणात असतात, ज्यामुळे शरीर निरोगी राहते.

मधुमेहापासून ते हृदय रोगापर्यंत आणि हाड मजबूत रहावीत यासाठी, काकडी खाणे आपल्या शरीरासाठी लाभदायक ठरू शकते. याव्यतिरिक्त, काकडीमधील हायड्रेशन गुणवत्ता आपल्याला आतड्यांना निरोगी ठेवण्यास, बद्धकोष्ठता रोखण्यास, किडनी स्टोनपासून संरक्षण करण्यास मदत करते.

आहार तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, काकडीमध्ये पाण्यासह फायबर, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, फॉस्फरस आणि पोटॅशिअम सारखी पोषक तत्वं मुबलक प्रमाणात असतात.

याशिवाय काकडीमध्ये व्हिटॅमिन – बी, ए आणि अँटी-ऑक्सीडेंट्सही मोठ्या प्रमाणात असतात, ज्यामुळे शरीराला अनेक लाभ मिळू शकतात. फ्री रॅडिकल्समुळे होणाऱ्या समस्यांपासून अँटी-ऑक्सीडेंट्स शरीराचे संरक्षण करण्यास मदत करतात.

**अनेक आजारांमध्ये काकडी खाल्याने होतो फायदा**

मधुमेह असलेल्या लोकांसाठी काकडी खाणे हा एक चांगला आहारातील पर्याय असू शकतो. मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यापासून होणारा धोका रोखण्यात काकडी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते.

यात असे पदार्थ आहेत जे रक्तातील साखर कमी करण्यास देखील मदत करू शकतात. त्याशिवाय काकडीमध्ये पोटॅशिअम आणि मॅग्नेशिअम असल्यामुळे ती हृदयरोगाच्या रुग्णांसाठी लाभदायक ठरते.

**(टीप –यात देण्यात आलेली माहिती ही सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)**


OM SHANTI BAHUDDESHIYA SHIKSHAN SANSTHA'S

**Guru Mishri College**

Shelgaon, Badnapur, Jalna

ADMISSION OPEN 2024-25

Courses Offered

ADMISSION OPEN 2024-25

Homoeopathy
BHMS - 100 Seats
M.D. Hom. - 51 Seats
Ph.D - 24 Seats
CET Cell College Code:-4346
Course Duration : 05.05 Year
H.S.C (Science With PCB Mark)

Ayurveda
B.A.M.S.
60 Seats
Course Duration : 05.05 Year
H.S.C (Science With PCB Mark)

Pharmacy
D. Pharmacy
60 Seats
DTE College Code:-2642
Course Duration : 02 Year
H.S.C (Science With PCB Mark)

Admission Process Maha- CET Cell
Online Registration Process on CET CELL Portal

Online Registration
Process on DTE Portal

Eligibility Criteria

| H.S.C Science (BAMS & BHMS. PCB Grouping) (D.Pharmacy PCB & PCM Grouping) | |
|---|---|
| General / EWS : ( 50% Marks in HSC Science) | SC/ST/SBC/OBC /VJNT 40 % Marks in HSC Science |
| NEET-2024 Mark | |
| General / EWS (162 Mark) | SC/ST/SBC/OBC /VJNT - (127 Mark) |

Contact : 9823728282 / 7686000013 / 9850695576 /9359772813 / 9673590111 / 9604014379 / 9529518551

प्रवेश प्रकिया ऑनलाईन असल्याने नोंदणी आवश्यक आहे, नोंदणीसाठी मार्गदर्शन आणि मदत केंद्र महाविद्यालय विनामुल्य उपलब्ध आहे.



**Education of the Day**

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ ऑक्टोबर २०२४

## अकृषक कर माफ, महसूल न्यायाधीकरणाच्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्तीसह विविध लोकप्रिय घोषणा - आजच्या मंत्रिमंडळात बैठकीत निर्णय



**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यात छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील पूर्णा नदीवरील दहा साखळी बंधाऱ्यांच्या कामांना मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे सिल्लोड तालुक्याला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. यासह इतर अनेक महत्त्वपूर्ण निर्णय पहा....

**राज्यातील अकृषिक कर पूर्णपणे माफ**

राज्यातील अकृषिक कर आकारणीचा जनतेवर पडत असलेला बोजा पूर्णपणे काढण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. सद्या गावातील गावठाणांमध्ये असणाऱ्या जमिनीवरील अकृषिक कर कायमस्वरुपी माफ आहे. मात्र गावठाणाबाहेर रहिवासी घरांची संख्या वाढत असल्याने आणि शहरी भागात बहूमजली इमारती वाढत असल्याने अशा इमारतींखालील जमिनींचा संपूर्ण अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे वाणिज्य आणि औद्योगिक वापराखालील जमिनीवरील अकृषिक कर रद्द करण्यात येईल.

**महसूल न्यायाधीकरणाच्या अध्यक्ष, सदस्य नियुक्तीसाठी जाहिरातीद्वारे अर्ज**

राज्यातील महसूल न्यायाधीकरणांच्या अध्यक्ष व सदस्य पदांवर नियुक्तीसाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागवण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणा प्रमाणेच महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधीकरणातील अध्यक्ष व सदस्यांसाठी जाहिरात काढून अर्ज मागवण्यात येतील. नियुक्तीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती असेल. या संदर्भातील महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधीकरण नियम,२०२४ च्या प्रारूपातील नियमांवर नागरिकांच्या हरकती व दावे मागवण्यात येतील.

**दौंड येथील बहूउद्देशीय सभागृह-नाटयगृहासाठी शासकीय जमीन**

पुणे जिल्ह्यातील दौंड येथे उभारण्यात येणाऱ्या बहुउद्देशीय सभागृहासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यासाठी मंजूरी देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. दौंड नगरपंचायतीला बहुउद्देशीय सभागृह व नाट्यगृहासाठी विनामुल्य कब्जे हक्काने भोगवटादार वर्ग-२ मध्ये ८० आर जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भात दौंड नगरपंचायतीने शासनास प्रस्ताव सादर केला होता.

**त्र्यंबकेश्वर तालुक्यातील किकवी प्रकल्पाच्या कामांना मान्यता**

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील मौजे ब्राह्मणवाडे येथील किकवी प्रकल्पाच्या कामास गती देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. किकवी पेयजल प्रकल्पाचे माती धरण, सांडवा, पाणी पुरवठा कम विद्यूत विमोचक आणि अनुषंगीक कामांना मान्यता देण्यात येत आहे. या कामांची विखंडीत केलेली निविदा मुळ अटी व शर्तीनुसार पुनरूज्जिवीत करण्यात येईल.

**टेंभू उपसा सिंचन योजनेस स्व. अनिलभाऊ बाबर यांचे नांव**

सांगली जिल्हयातील टेंभू उपसा जलसिंचन योजनेच्या विस्तारित टप्प्यास स्वर्गीय आमदार अनिलभाऊ बाबर विस्तारित टेंभू उपसा सिंचन योजना, टप्पा क्रं.६ असे नांव देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या संदर्भात या प्रकल्पाच्या भूमिपूजनाच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केली होती.

**पूर्णा नदीवर दहा साखळी बंधाऱ्यांच्या कामांना गती - सिल्लोडला सिंचनाचा लाभ मिळणार**

छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील पूर्णा नदीवरील दहा साखळी बंधाऱ्यांच्या कामांना मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. एकूण सहा उच्च पातळी बंधारे व चार कोल्हापूरी बंधारे अशा दहा बंधाऱ्यामुळे सिल्लोड तालुक्यातील १२ गावांमधील १ हजार ४२२ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. यासाठी येणाऱ्या ५३४ कोटी ९२ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

**प्राचीन, ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास - दोन वर्षाचा तुरुंगवास, एक लाख दंडाची तरतूद**

राज्यातील प्राचीन व ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास आता दोन वर्षांच्या तुरूंगवासाची तसेच एक लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. अशा वास्तूंना हानी पोहचवून त्यांचे पावित्र्य भंग करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी ही तरतूद करण्यात येत आहे. सध्या, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पूराणवस्तूशास्त्रविषयक स्थळे व अवशेष नियम १९६० (१९६१चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१२) मधील तरतुदींनुसार तीन महिन्यांपर्यंत तुरुंगावस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतूद आहे. १९६० सालापासून या दंडात वाढ झालेली नाही. या कायद्यात कठोर तरतुदींचा आवश्यकता आहे. केंद्र शासनाच्या १९५८च्या अधिनियमातील सुधारणांशी सुसंगत अशा तरतूदी करणे आवश्यक असल्याने हा वाढीव शिक्षेचा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

**राज्यातील खेळाडूंसाठी पारितोषिकांच्या रक्कमेत वाढ**

आंतरराष्ट्रीयस्तरावर महाराष्ट्राचे नाव उज्वल करणाऱ्या खेळाडूंना आणि त्यांच्या प्रशिक्षकांच्या पारितोषिकांच्या रक्कमेत वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. ऑलिम्पिंक, पॅराआलिम्पिंक सूवर्ण पदक विजेत्यांना पाच कोटी रुपये, रौप्य पदकासाठी तीन कोटी, कांस्य पदकासाठी दोन कोटी रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. तर मार्गदर्शकांना अनुक्रमे पन्नास लाख, तीस लाख व वीस लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. वरिष्ठ वर्ल्ड चॅम्पियनशीपसाठी सूवर्ण पदक विजेत्यांना तीन कोटी रुपये, रौप्य पदकासाठी दोन कोटी, कांस्य पदकासाठी एक कोटी रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. तर मार्गदर्शकांना अनुक्रमे तीस लाख, वीस लाख व दहा लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. एशियन गेमसाठी सूवर्ण पदक विजेत्यांना एक कोटी रुपये, रौप्य पदकासाठी पंच्याहत्तर लाख, कांस्य पदकासाठी पन्नास लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. तर मार्गदर्शकांना अनुक्रमे दहा लाख, सात लाख पन्नास हजार व पाच लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. वरिष्ठ कॉमनवेल्थसाठी सूवर्ण पदक विजेत्यांना सत्तर लाख रुपये, रौप्य पदकासाठी पन्नास लाख, कांस्य पदकासाठी तीस लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. तर मार्गदर्शकांना अनुक्रमे सात लाख, पाच लाख व तीन लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

युथ ऑलिंम्पिंकमधील सूवर्ण पदक विजेत्यांना तीस लाख रुपये, रौप्य पदकासाठी वीस लाख, कांस्य पदकासाठी दहा लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. तर मार्गदर्शकांना अनुक्रमे तीन लाख, दोन लाख व एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

तसेच सांघिक खेळात ऑलिंम्पिंक, पॅराआलिम्पिंकमध्ये सूवर्ण पदक विजेत्यांना तीन कोटी पंच्याहत्तर लाख रुपये, रौप्य पदकासाठी दोन कोटी पंचवीस लाख तर कांस्य पदकासाठी एक कोटी पन्नास लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. तर मार्गदर्शकांना अनुक्रमे सदतीस लाख पन्नास हजार, बावीस लाख पन्नास हजार व पंधरा लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

सांघिक खेळात वरिष्ठ चॅम्पियनशीपमधील सूवर्ण पदक विजेत्यांना दोन कोटी पंचवीस लाख लाख रुपये, रौप्य पदकासाठी एक कोटी पन्नास लाख लाख तर कांस्य पदकासाठी पंच्याहत्तर लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. तर मार्गदर्शकांना अनुक्रमे बावीस लाख पन्नास हजार, पंधरा लाख आणि सात लाख पन्नास हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

सांघिक खेळात एशियन गेममध्ये सूवर्ण पदक विजेत्यांना पंच्याहत्तर लाख रुपये, रौप्य पदकासाठी ५६ लाख पंचवीस हजार तर कांस्य पदकासाठी सदतीस लाख पन्नास हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. तर मार्गदर्शकांना अनुक्रमे सात लाख पन्नास हजार, पाच लाख बासष्ठ हजार पाचशे रुपये व तीन लाख पंच्याहत्तर हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

सांघिक खेळात वरिष्ठ कॉमनवेल्थ स्पर्धेतील सूवर्ण पदक विजेत्यांना बावन्न लाख पन्नास हजार रुपये, रौप्य पदकासाठी सदतीस लाख पन्नास हजार, तर कांस्य पदकासाठी बावीस लाख पन्नास हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. तर मार्गदर्शकांना अनुक्रमे पाच लाख पंचवीस हजार, तीन लाख पंच्याहत्तर हजार रुपये व दोन लाख पंचवीस हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

सांघिक खेळात युथ ऑलिंम्पिंकमधील सूवर्ण पदक विजेत्यांना बावीस लाख पन्नास हजार रुपये, रौप्य पदकासाठी पंधरा लाख, तर कांस्य पदकासाठी सात लाख पन्नास हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. तर मार्गदर्शकांना अनुक्रमे दोन लाख पंचवीस हजार, एक लाख पन्नास हजार रुपये व पंच्याहत्तर हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

**संत भगवान बाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना राबवणार**

राज्यातील सर्व ऊसतोड, वाहतूक कामगार व मुकादमांना झोपडी व बैल जोडी करिता विमा संरक्षण देण्यासाठी संत भगवान बाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना राबवण्याचा निर्णय आज आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. साखर कारखान्यांकडून ऊस गाळपावर प्रतिवर्षी प्रति मेट्रीक टन दहा रुपयांप्रमाणे मिळणाऱ्या निधीतून या विमा योजनेसाठी खर्च करण्यात येईल. दि न्यू इंडिया अश्युरन्स कंपनी ही यासाठी विमा कंपनी असेल.

**लहान जलविद्युत प्रकल्पासाठी बांधा वापरा हस्तांतरण धोरण**

राज्यातील लहान जलविद्युत प्रकल्पांचे व सहःस्थित सौर ऊर्जा प्रकल्पांचे खाजगीकरणातून बांधा, वापरा व हस्तांतरण करा (BOT) तत्वावर विकास करण्याच्या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यापूर्वीच्या लहान जलविद्युत प्रकल्पांचे खाजगीकरणातून विकासाच्या धोरणांतर्गत १६३.६५ मे. वॅ. क्षमतेचे एकूण ४२ जलविद्युत प्रकल्पांची उभारणी करण्यात आलेली आहे. हे धोरण सुधारित करण्याची गरज होती. त्यानुसार प्रवर्तकाने स्वतः शोधलेल्या जलविद्युत प्रकल्पांचा थेट विकसनाचा पर्याय या नव्या धोरणात उपलब्ध असेल. शासन संकेतस्थळावरील १०१.३९ मे. वॅ. क्षमतेच्या ३७ जलविद्युत प्रकल्पांच्या विकसनाकरिता पारदर्शक निविदा पद्धतीचा अवलंब करुन प्रवर्तकाची निवड करण्यात येईल. ज्या प्रकल्पांकरिता आदान संरचना (Intake Structure) उपलब्ध असेल, त्या प्रकल्पांकरिता रु. ५० लक्ष प्रति मे.वॅ. इतके निर्धारित अधिमुल्य (Threshold Premium) निश्चित करण्यात आलेले आहे.

या धोरणानूसार महामंडळाच्या मालकीच्या जागांकरीता रु. ३५ प्रति कि.वॅ. / प्रति वर्ष भाडेपट्टी, संकरित भू पृष्ठावरील सौर ऊर्जा प्रकल्पांकरीता १० पैसे प्रति युनिट तर जल पृष्ठावरील तंरगत्या सौर प्रकल्पाकरिता ५ पैसे प्रती युनिट अतिरिक्त भाडेपट्टा व जलसंपदा विभागाच्या आदान संरचनेकरिता १० पैसे प्रति युनिट आदान संरचना देखभाल शुल्क महामंडळास महसूल स्वरुपात मिळेल.

**कोकण पुणे विभागासाठी एसडीआरएफच्या दोन कंपन्या**

कोंकण व पुणे विभागासाठी प्रत्येकी एक या प्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या-एसडीआरएफच्या दोन कंपन्या स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. कोंकणात नवी मुंबई येथे आणि पुण्यात दौंड येथे या कंपन्या असतील. प्रत्येक कंपनीत एकूण चार टिम असतील. त्यापैकी तीन टिम्स प्रत्यक्षात आपत्ती प्रतिसादात काम करतील. या दोन्ही कंपन्यांसाठी ४२८ पदे पोलीस महासंचालकांमार्फत निर्माण केली जातील. यासाठी ३७ कोटी रुपये खर्च येईल.

**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात - सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना**

नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात पात्र शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत दोन लाभांची आश्वासित प्रगती योजना लागू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या विद्यापीठातील २४ संवर्गातील २२७ शिक्षकेतर पदांना या योजनेत लाभ मिळणार आहे. वित्त विभागाच्या १ एप्रिल २०१०, ५ जुलै २०१० आणि ६ सप्टेंबर २०१४च्या शासन निर्णयानुसार पूर्वलक्षी प्रभावाने तरतुदी लागू होतील.

**राज्यात आरोग्य क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र स्थापन करणे**

राज्यात आरोग्य क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या अखत्यारितील महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संसोधन संस्था ही मुख्य उत्कृष्टता केंद्र असेल. यासाठी येणाऱ्या ७० कोटी ७५ लाख रुपये इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली. या केंद्रांच्या कार्यान्वयानासाठी कंपनी कायदा २०१३ मधील सेक्शन ८ अंतर्गत कंपनी स्थापन करण्यात येईल.

**विविध समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे**

राज्यातील जैन, बारी, तेली, हिंदू-खाटीक, लोणारी या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. विविध समाजातील घटकांची सामाजिक व आर्थिक उन्नती व्हावी तसेच युवकांना देखील शिक्षणासाठी फायदा व्हावा यासाठी ही महामंडळे काम करतील. यात जैन समाजासाठी जैन समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल. या महामंडळाच्या कामासाठी १५ पदे मंजूर करण्यात आली. याशिवाय बारी समाजासाठी संत श्री रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) स्थापन करण्यात येत आहे. याशिवाय तेली, हिंदू-खाटीक, लोणारी या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**पुणे रिंग रोड प्रकल्पाच्या कामास मान्यता**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ-एमएसआरडीसीमार्फत पुणे शहराभोवती बांधण्यात येणाऱ्या रिंग रोडच्या कामास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. पुणे रिंग रोडच्या पूर्व भागात ऊर्से ते सोलू ते सोरतापवाडी (पुणे-सोलापूर रस्ता) या रस्त्याच्या १९ हजार ९३२ कोटी ९८ लाख रुपये इतक्या किंमतीच्या कामांना, तसेच पुणे रिंग रोड पश्चिम भागात ऊर्से ते वरवे (बु.) सातारा रोडसाठी २२ हजार ७७८ कोटी ५ लाख इतक्या किंमतीच्या कामांना सुधारित मान्यता देण्यात आली.

## राहुल गांधींच्या विमानात तांत्रिक बिघाड



**कोल्हापूर :** लोकसभेतील विरोधी पक्ष नेते व कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांचा आजचा शुक्रवारचा दौरा अचानक सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या दरम्यान रद्द झाला. त्याच्या दिल्लीहून येणा-या विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने हा दौरा रद्द झाला.आता ते उद्या शनिवारी सकाळी ८.४५ वाजता कोल्हापुरात येणार असून त्यांच्याच हस्ते कसबा बावडा येथील भगवा चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार आहे. कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष व या कार्यक्रमाचे संयोजक आमदार सतेज पाटील यांनीही त्यास दुजोरा दिला. या पुतळ्याचे अनावरण राहुल गांधी यांच्याच हस्ते होईल असेही आमदार पाटील यांनी स्पष्ट केले. पूर्व नियोजित कार्यक्रमानुसार राहुल गांधी आज शुक्रवारी ५.४० वाजता कोल्हापुरात येणार होते. त्यानंतर सायंकाळी त्यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण होते.त्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. परंतू अचानक दौ-यात बदल झाल्याची बातमी आली. आता उद्या सकाळी ते १० वाजता त्यांच्या हस्ते पुतळा अनावरण सोहळा होईल. त्यानंतर ते शाहू समाधीस्थळी राजर्षि शाहू महाराज यांना अभिवादन करतील. त्यानंतर संविधान सन्मान परिषदेस उपस्थित राहून सायंकाळी खास विमानाने दिल्लीस रवाना होतील. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राला या दौ-याबद्दल उत्सुकता आहे.